International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# ‘गोंधळ’ – एक लोककलाविष्कार

डॉ. अन्नपूर्णा अ. चौधरी

मराठी विभाग प्रमुख, श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा जि.यवतमाळ

‘गोंधळ’ हा कलाप्रकार धार्मिक विधी म्हणून कार्य पार पाडण्यासाठी महाराष्ट्रात प्रख्यात आहे. कुलदेवतेच्या कृपेने कोणतेही कार्य पार पाडण्यासाठी महाराष्ट्रात अनेक घरात हा कुळाचार केला जातो. ‘गोंधळ’ म्हणजे ‘गडबड’ ‘धिंगाणा’ अशा अर्थाने हा शब्दप्रयोग होत असला तरी ‘गोंधळ’ म्हणजे देवीची स्तुतीच आहे. ‘गोंधळ’ सादर करण्यापूर्वी घटस्थापना केली जाते. अशा वेळी गोंधळी विशिष्ट पेहराव परिधान करुन गळ्यात कवड्याची माळ घालून गोंधळ सादर करतात.

महाराष्ट्रात गोंधळाची एक प्राचीन परंपरा आहे. ते खालील पद्धतीने गोंधळ घालतात.

ज्या ठिकाणी गोंधळ घालावयाचा तेथे गोंधळी लोक देवीची पूजा करतात त्याला चौक भरणे म्हणतात. देवी पूजेत हा विधी गोंधळी महत्वाचा मानतात. देवीची पूजा केल्यानंतर गण गायला जातो. तसेच देवीची गाणी देखील गायली जातात. ही गाणी देवीचे महात्म्य विशद करणारी असतात. यात पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भाग पाडले जातात. वेगवेगळ्या देवतांना गोंधळाला येण्याचे आवाहन केले जाते.

उदा. “देवीचा गोंधळ मांडला, गोंधळाला यावे
परळीच्या वैद्यनाथा, गोंधळाला यावे
औंढ्याच्या नागनाथा, गोंधळाला यावे
जेजुरीच्या खंडेराया, गोंधळाला यावे
नवलाख तारांगणा, गोंधळाला यावे
धरतरी माता, गोंधळाला यावे
राहिले साहिले, गोंधळाला यावे
भक्तीच्या गणा, गोंधळाला यावे

देवीच्या विविध गीतांचे गायन केले जाते. तसेच अनेक काव्यगीते गाईली जातात. लोकजीवनात, लोक परंपरेत, लोकवर्गात आणि देवधर्मात मोलाचे स्थान असलेला ‘गोंधळ’ हा आदिशक्तीचे स्मरण करुन देणारा लोककला प्रकार आहे. त्यात भक्तीभाव आहे. लोकरंगभूमीचा गोंधळ हा एक सुंदर कलाविष्कार होय. प्रा. डॉ. रेखा घाटोळ म्हणतात त्याप्रमाणे, “संस्कृती परंपराचे रुढी आणि श्रद्धांचे समाजिक वास्तव आणि नैतिक मूल्यांचे दर्शन घडविणारा कला प्रकार म्हणजे गोंधळ होय”

गण, गौळण, नमन, आवाहन झाले की गायनातून विविध कथा सांगितल्या जातात. गोंधळी आपल्या स्मरणशक्तीचा कल्पकतेचा व कथाकथन शैलीचा व वक्तृत्व कलेचे दर्शन घडवतो. नाट्य, गीत, वाद्य या मुळे हा कला प्रकार श्रवणीय ठरतो. गोंधळाच्या या गितावरुन मराठी लोकधर्माची जडणघडण कशी झाली याचे दर्शन होते. गोंधळाचा कुळाचार पार पाडणाऱ्या गोंधळ्याला लोकधर्मात लोकपुरोहिताचा मान आहे.

गोंधळातून वीर, करुण, वात्सल्य इ. रस आळविले जातात. यादव आणि शिवकाळात गोंधळ खूपच लोकप्रिय असल्याचे दिसून येते. गोधळगीतात भाषा, शब्दयोजना, अर्थ, लालीत्य आणि त्यातील प्रसादगुण यांचा मनोहरी मिलाफ दिसून येतो. आदिशक्ती बद्दलची श्रद्धा, व भावना त्यात ओतप्रोत सामावलेली असते.

गोंधळ घालण्याची परंपरा फार प्राचीन असल्याचे दिसून येते. या संदर्भात रा.चि. ढेरे म्हणतात, “यादवकालीन मराठी वाङ्‌मयात गोंधळाचे जे उल्लेख येतात त्यावरुन असे दिसते की गोंधळाचा संबंध मुळात भूतमाता नावाच्या एका देवतेशी असावा आणि नंतर ती भूतमाता महाराष्ट्रात लोकप्रिय असलेल्या रेणूकेत समाविष्ट झाली असावी.” महाराष्ट्रातील बहुसंख्य घरात कुळाचाराचा संस्कार म्हणून गोंधळ घातला जातांना दिसतो. घरातील कोणतेही मंगलकार्य, नव्या जीवाचे स्वागत, लग्नकार्य, गृहप्रवेश, नवस इ. प्रसंगी गोंधळ घातला जातो. देवतांच्या अर्थात रेणुका, अंबाबाई, भवानी या देवतांच्या कृपेमुळे घरातील कार्य पार पडावे किंवा पार पडले व तिच्या कृपाप्रसादाला उतराई होण्यासाठी व त्या उपकाराचे स्मरण करण्यासाठी हा उपासनाविधी करण्यात येतो.

सारांश:

महाराष्ट्रात गोंधळ या लोककला प्रकाराबद्दल अपार प्रेम आहे विशेषत: महाराष्ट्राच्या ग्रामिण भागात गोंधळाचे विशेष महत्व आहे. महाराष्ट्रातील लोकमानसाची अपार श्रद्धा ‘गोंधळ’ या कुळाचारावर असल्याचे पहायला मिळते. गोंधळ ही एक लोककला असून मौखीक परंपरेने ती आजही चालत आहे. महाराष्ट्राच्या लोकधर्मात कुळाचाराची प्रतिष्ठा प्राप्त झालेला नाट्यरुप धार्मिक विधी आहे. गोंधळ हा विधी केवळ भक्तीच्या, अंधश्रद्धेच्या तालमीत वाढला नाही तर तो सभोवतीच्या सामाजीक व राजकीय जीवनात महत्वपूर्ण भुमिका वाढवली. जीवनमूल्याचा स्वीकार आणि रंजन या दोन्ही अंगाने ‘गोंधळ’ या कलेने महत्वपूर्ण भूमिका निभावली. गोंधळाच्या माध्यमातून लोकपरंपरेचा इतिहास आजही तेवत आहे.

संदर्भ ग्रंथ :

1. संपा.डॉ.मधुकर नंदनवार – लोकनाट्य दशा आणि दिशा
2. रा.चि.ढेरे – मनोहर, नोव्हेंबर 1963
3. दुर्गा भागवत – लोकसाहित्याची रुपरेषा
4. डॉ. प्रभाकर मांडे – लोकसाहित्याचे अंत:प्रवाह